<u>वित्तीय मान्यतेबाबत</u>..
सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात, लेखाशिर्ष २४०१ २४४२ खालील ३१- सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) करीता मंजूर अर्थसंकल्पिय तरतुदीच्या ८० % चे मर्यादेत तरतुदी वितरीत करण्यास मान्यताबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्व्यवसाय विभाग
शासन निर्णय क्र. आकृवि -०७१७ /प्र.क्र.२५० /१५-अे
मंत्रालय (विस्तार), मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २६ फेब्रुवारी, २०१८.

<u>वाचा:</u> १) शासन परिपत्रक , वित्त विभाग, क्र. अर्थसं -२०१७/ प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८/०४/२०१७.
२) शासन परिपत्रक , वित्त विभाग, क्र. अर्थसं -२०१७/ प्र.क्र.९४/अर्थ-३, दि.३०/०६/२०१७.
३) कृषि व पदुम विभाग, पत्र क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.१२५/२-अे, दि.२५/०७/२०१७.
४) शासन निर्णय , कृषि व पदुम. विभाग, सम क्रमांक , दिनांक २९/०७/२०१७.
५) शासन परिपत्रक , वित्त विभाग, क्र. अर्थसं -२०१७/ प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.०६/०२/२०१८.

<u>शासन निर्णय :-</u>

कृषि विभागाच्या,जिल्हापरिषदेकडील १६३५ अधिकारी/कर्मचारी पदांच्या सुधारित आकृतीबंधास शासन मान्यतेनंतर, **लेखाशिर्ष २४०१ २४४२,** विशेष घटक योजनेखाली खते, बी-बियाणे इत्यादींसाठी अर्थसहाय्य, खालील बाब, **३१-सहायक अनुदाने (वेतनेत्तर),** सन २०१७-२०१८ करीता रु.३.०० कोटी इतकी अर्थसंकल्पिय तरतुद करण्यात आलेली आहे.

२. वित्त विभागाने दिनांक ०६/०२/२०१८ च्या शासन परिपत्रकान्वये अर्थसंकल्पित तरतुदीच्या **८०%** मर्यादेत निधी वितरणास मान्यता दिली आहे. सबब **लेखाशिर्ष २४०१ २४४२,** विशेष घटक योजनेखाली खते, बी-बियाणे इत्यादींसाठी अर्थसहाय्य, या खालील बाब, **३१-सहायक अनुदाने (वेतनेत्तर) करिता** सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीता **रूपये रू.१.६० कोटी (रूपये एक कोटी साठ लाख फक्त)** तरतुद वितरीत करण्यास या शासन निर्णयाद्वारे वित्तीय मान्यता देण्यात येत आहे. सदर निधी मंजूर प्रयोजनासाठीच खर्च करण्यात येईल, याची सर्वतोपरी दक्षता घेण्यात यावी.

३. या प्रित्यर्थ होणारा खर्च सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षामध्ये मंजूर केलेल्या अनुदानातून खालील लेखाशिर्षाखाली करण्यात यावा.

मागणी क्रमांक डी-३
२४०१, पिकसंवर्धन
(००)८०० इतर खर्च
(००) (०२) विशेष घटक योजना-
विशेष धटक योजनेखाली अर्थसहाय्य **(रूपये १.६० कोटी)**
३१-सहायक अनुदाने (वेतनेत्तर)
(२४०१ २४४२)

४. हे आदेश, वित्त विभागाचे परिपत्रक, क्र. अर्थसं -२०१७/ प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८/०४/२०१७ मधील निदेशानुसार व वित्त विभाग, शासन परिपत्रक, क्र. अर्थसं -२०१७/ प्र.क्र.९४/अर्थ-३, दि.३०/०६/२०१७.मधील अटी व शर्तीचे अनुपालन यांचे अधीन राहून प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या प्राधिकारात निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१८०२२६१५१६२२२७०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Umesh Madhukar Madan

Digitally signed by Umesh Madhukar Madan
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6a20cbbc812f8be8371fb8e96ab39865278090eca38793fc8e3967bd332d3272, cn=Umesh Madhukar Madan
Date: 2018.02.26 15:18:21 +05'30'

(उ. म. मदन)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२) सर्व विभागीय आयुक्त (महसुल)
३) सर्व, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (द्वारा आयुक्त , (कृषि) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे)
४) सर्व, विभागीय कृषि सह संचालक
५) सर्व ,जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी ((द्वारा आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे)
६) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखापरिक्षा) मुंबई/नागपूर
७) सर्व, जिल्हा कोषागार अधिकारी (द्वारा आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे)
८) सर्व , कृषि विकास अधिकारी, (द्वारा आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे)
९) सर्व, उप विभागीय कृषि अधिकारी, (द्वारा आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे)
१०) सर्व, तालुका कृषि अधिकारी, (द्वारा आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे)
११) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
१२) कार्यासन (२-अे) कृषि व पदूम विभाग, मंत्रालय, मुंबई
१३) निवड नस्ती /१५अे.